## प्रकरण ३ रे
## 'शोध' कादंबरीतील समाजजीवन व वाङ्मयीन वैशिष्ट्ये

'शोध' कादंबरीतील समाजजीवन
मध्यमवर्गीय पांढरपेशा समाज जीवन
पुरुषप्रधान संस्कृती
'शोध'मधील जीवनचित्रण
वेश्यावस्तीचे चित्रण
वेश्यावस्तीतील धार्मिकता
वेश्यांचे राहणीमान
वेश्यांची संतती
समाजाचा वेश्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन
वेश्यांचा समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन
वेश्यांचे समाजातील स्थान
स्त्रिया वेश्या व्यवसायाकडे का वळतात?
वेश्या व्यवसाय
वेश्यांचा अंत
कारणीभूत कोण?
जुनी पिढी व नवी पिढी तफावत
'शोध' कादंबरीची वाङ्मयीन वैशिष्ट्ये
कथानक
व्यक्तिरेखा
वातावरण निर्मिती
भाषाशैली
घटना व प्रसंगांची मांडणी
निवेदनशैली
समारोप



15414

## प्रकरण ३ रे

# 'शोध' कादंबरीतील समाज जीवन व वाङ्मयीन वैशिष्ट्ये

एकविसाव्या शतकातील नीलम माणगावे या सामाजिक बांधीलकी मानणाऱ्या लेखिका आहेत. त्यांनी बारबालाबंदी चळवळीच्या पार्श्वभूमीवर वेश्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर आधारीत 'शोध' ही कादंबरी लिहिली आहे. अलीकडे तर वेश्या व्यवसाय करणाऱ्यांचे वेगळेच रुप दिसण्यात येते. भाड्याच्या घरात खानदानी पद्धतीने राहण्याचे नाटक करुन त्या कुटुंबातील पुरुष दलाली करतो व बायकांना वेश्या व्यवसाय करायला लावतो. ''मुळात ही नौटंकी म्हणजे बारबाला, महानगरातील ललनांनी भाड्याने निर्माण केलेली आभासी कौटुंबिक पद्धत आहे. अशा कुटुंबांमधील पुरुष हा व्यसनी आणि मवाली पठडीतला दरमहा दलाली घेणारा महाभाग असतो.''[१] बारबालाबंदी चळवळीच्या पार्श्वभूमीवर माणगावेंनी वेश्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर आधारित शोध ही कादंबरी लिहिली आहे.

नीलम माणगावे यांची 'वेश्या' जीवनावर आधारित १९२ पानांची 'शोध' ही कादंबरी २५ मार्च २००५ साली सकृत प्रकाशनाने प्रकाशित केली. महागाई, बेकारी, भ्रष्टाचार इ. विविध सामाजिक समस्यांपैकी सर्वांच्याच चिंतनाचा व चिंतेचा विषय बनलेल्या 'वेश्ये'च्या जीवनावर आधारित ही कादंबरी आहे. या कादंबरीतील समाज जीवन व वाङ्मयीन वैशिष्ट्ये यांचा प्रस्तुत तिसऱ्या प्रकरणात अभ्यास केला आहे.

**'शोध'मधील समाजजीवन**

नीलम माणगावे यांच्या 'शोध' कादंबरीत दोन स्तरातील समाजजीवन चित्रित झालेले दिसते. मध्यमवर्गीय, पांढरपेशा समाजाचे तसेच वेश्यांचे मागास जीवन चित्रण 'शोध'मध्ये केलेले आहे. पुरुषप्रधान संस्कृती, स्त्रीच्या मर्यादा, बंधने, स्त्रिया वेश्या व्यवसाय का करतात? वेश्यांची जीवनपद्धती इ.चे चित्रण केलेले आहे.

**मध्यमवर्गीय, पांढरपेशा समाजजीवन**

कविता, कविताचा नवरा, त्यांची मुले अपर्णा व सानंद यांच्या कुटुंब दर्शनातून मध्यमवर्गीय समाजाचे दर्शन घडते. ‘‘समाजाची ज्या प्रकारची स्थिती गती असेल, ज्याप्रकारचे काळाचे आव्हान असेल, ज्याप्रकारच्या जीवनविषयक मूल्यकल्पना असतील त्यावर साहित्य व समाज यांचे परस्पर संबंध अवलंबून असतात.’’[२] मध्यमवर्गीय, पांढरपेशा समाज वेश्यांकडे म्हणावे तितक्या चांगल्या नजरेने पहात नाही. वेश्यांकडे जाणे म्हणजे वाईट समजतात. तरीही याच समाजातील पुरुषांमुळे वेश्या निर्माण होतात व जगत असतात. माणगावे ‘शोध’ कादंबरीत केवळ वेश्यांचे दु:खच चित्रित करीत नाहीत तर मध्यमवर्गीय स्त्रीची व्यथादेखील चित्रित करतात. एवढंच नव्हे तर सर्व स्त्री जातीची वेदना ‘शोध’ मधून मांडताना दिसतात.

**पुरुषप्रधान संस्कृती**

नीलम माणगावे यांच्या ‘शोध’ कादंबरीत पुरुषप्रधान संस्कृतीचे दर्शन घडते. गुलाबी व शराबीसारख्या वेश्यांचा जन्म हाच मुळात पुरुषप्रधान संस्कृतीचे द्योतक आहे. गुलाबीचा बाप वंशाला दिवा हवा म्हणून सात मुलींना जन्म देतो. मुलगा नाही म्हणून गुलाबीच्या आईला रोज मारतो. तिला शिव्या देतो. पण गुलाबीची आई याबाबतीत काहीही करु शकत नाही. गुलाबीवर बलात्कार करणारा पोलीस, शराबीवर बलात्कार करणारा हेडमास्तर दोघे अन्यायी, क्रूर पुरुष यांच्या विरूद्धदेखील गुलाबी काहीही करु शकत नाही. शेवटी दोघीही आयुष्यात सर्वसामान्य जीवन जगण्याची इच्छा असूनही पुरुषप्रधान संस्कृतीचा बळी ठरतात. कविताकडूनही तिने केवळ घर सांभाळावे, नवऱ्याला खुश ठेवावं अशी अपेक्षा केली जाते. कविताला वाटते नवऱ्याच्या कामात बायको स्वत:ला झोकून देते. मुलांचीही कामे ती स्वत:च करते. पण तिचं काम कोणीही आपलं समजत नाही. ते फक्त तिचेच असते. बायकांचे काम ते स्वत: तर करत नाहीच पण तिलाही विरोध करतात आणि कोणी परवानगी दिली तरी एखाद्या उपकारकर्त्याच्या भूमिकेतून तिला होकार देतात. ‘काम करु दिलं, हे काय कमी झालं’, अशी त्यांची भावना असते.

कविताचा नवरा अपर्णाला वेश्यावस्तीत नेल्याने चिडतो. तिच्याबरोबर भांडतो. कविता म्हणते, ''बायकांनी पुरुषांना आवडेल तसंच वागायला हवं! पुरुषांनी सांगितलेलं ऐकायला हवं! त्यांच्या इच्छेविरूद्ध जाता कामा नये, त्यांचा स्वाभिमान दुखावता कामा नये... अशी जी परंपरागत पुरुषी मानसिकता असते...''[३] पण यातून स्त्रिला मुक्ती मिळाली पाहिजे असे लेखिकेला सांगावयाचे आहे असे वाटते. आ. ग. जाधव लिहितात, ''स्त्री मुक्ती हे एक बंड आहे पण ते केवळ मूर्तिभंजक विध्वंसक स्वरूपाचे ठरू नये.''[४] असे असे असल्यामुळेच की काय माणगावे यांच्या कादंबरीतील स्त्रिया परंपरेला चिकटून वागताना दिसतात.

पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्री जगत असताना ती आपल्या घरासाठी झटते. कष्ट उपसते. नवऱ्यानं कितीही मारलं, छळलं तरी आपलं घर सोडत नाही. या संदर्भात माणगावे लिहितात, ''गेलास उडत... फूट...!' म्हणून नवरा नावाच्या पुरुषाला घरातून कधीही बाहेर काढत नाहीत. तो मात्र बायकोला अर्ध्या रात्रीला नेसत्या वस्त्रानिशी घराबाहेर काढू शकतो....''[५] तसेच 'नवरासुद्धा बायकोवर बलात्कार करत असतो', असा वेगळा विचार मांडून केवळ वेश्येचेचं दुःख मांडत नाहीत तर विवाहित स्त्रीचेही दुःख मांडताना दिसतात. वेश्यांना गिऱ्हाईक म्हणून पुरुषांना जपावं लागत असलं तरी त्या कोणत्याही पुरुषाची अरेरावी सहन करत नाहीत पण विवाहित स्त्रियांचं यापेक्षा वेगळं काय असतं? माणगावे म्हणतात, 'विवाहित स्त्री नवरा नावाचं गिऱ्हाईक जपत असते. कधी पोटापाण्यासाठी, घरंदाज घराण्याचं नाव राखण्यासाठी, बापाची अब्रू राखण्यासाठी, बाईपणाचा धर्म निभावण्यासाठी, घर जपण्यासाठी, कधी आपल्या मुलांसाठी ती नवऱ्याचा सर्व छळ सहन करत असते. नवऱ्याची अरेरावी सहन करत असते. स्त्रीची ही फरफट पूर्वापार चालत आलेली आहे. 'शोध' कादंबरीत माणगावे पुरूषप्रधान संस्कृतीमुळे वेश्यांच्या बरोबरच एकूण स्त्रीचेच दुःख मांडताना दिसतात.

**वेश्या जीवनचित्रण**

समाजात पुरुषांची शारीरिक भूक भागविण्याचा व्यवसाय करणाऱ्या, आपल्या देहविक्रय करणाऱ्या स्त्रिया वेश्या व्यवसाय करताना दिसतात. नीलम माणगावेंनी याच वेश्यांवर, वेश्याव्यवसायांवर पोसणाऱ्या सर्वांवर आधारित 'शोध' ही कादंबरी लिहिली आहे. 'शोध'मध्ये 'गुलाबी' या वेश्येची कहाणी असली तरी तिची कहाणी वाचत असताना वेश्या व्यवसाय चालवणाऱ्या एकूणच समाज यंत्रणेचे चित्रण त्यात आलेले आहे.

नीलम माणगावेंनी वेश्यांचे जीवन चित्रण करताना वेश्यावस्तीचे, त्या वस्तीत राहणारे गुंड, दलाल, रोगराई, वेश्यांची संतती, वेश्यांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन इ. अनेक गोष्टींचा ऊहापोह परिणामकारकरित्या केलेला दिसतो. वेश्यांचे धार्मिक स्थान यल्लम्मा, तिच्यावरची श्रद्धा यावरही माणगावेंनी भाष्य केलेले दिसते.

**वेश्यावस्तीचे चित्रण**

गुलाबी, शराबीसारख्या वेश्यांचे संपूर्ण आयुष्य त्या वस्तीत जाते. त्या वस्तीचे चित्रण नीलम माणगावे यांनी 'शोध' या कादंबरीत केलेले दिसून येते. पूर्वीची वेश्यावस्ती व आताची वेश्यावस्ती यातील फरकही त्या दाखवून देतात. कविता नववीत असताना ती शाळेत जाताना रोज वेश्यावस्ती पहात होती. पूर्वीची वेश्यावस्ती म्हणजे कोणत्याही खेड्यातील गरीब मजदुरांची घरे असावीत त्याप्रमाणे आठ दहा झोपडीवजा घरे असत. तिथले लोकही लाचार, गरीब, अर्धपोटी असत. पण आताच्या वेश्यावस्तीत फरक पडलेला जाणवतो. हा फरक सांगताना लेखिका लिहितात... ''आता या कडेपासून त्याकडेला दोन्ही बाजूला घरं असलेली गल्लीच्या गल्ली वेश्यांची होती. वाढत्या लोकसंख्येनुसार त्यांचीही वस्ती वाढली होती. व्यक्तिशः त्यांच्या राहणीमानात फरक पडला होता. पण वस्तीचा बकालपणा तोच होता. कोंबड्याच्या खुराड्यासारखी असलेली घरं उघड उघड दारिद्र्य दाखवत होती''[६]

गुलाबी व शराबी ह्या वेश्यावस्तीत, गल्लीत राहतात. तेथे सर्वत्र सिगारेटची पाकिटे, तंबाखू, गुटख्याची रंगीत गुळगुळीत छोटी पाकीटे असलेली असतात. त्याचबरोबर कचरा, कागदाचे बोळे पसरलेले असतात. घरासमोर पाण्याचे ओहोळ असतात. घोंगावणाऱ्या माशा,

हुंगणारी कुत्री, डुक्करं, मांजरं असतात. या सर्वांतून निर्माण होणारी रोगराई वेश्यावस्तीत आढळते. एकूणच झोपडपट्टीचं दृश्य दिसून येतं. तसेच घराच्याकडेला थोड्या थोड्या अंतरावर पानपट्टीची दुकानं, चहावाल्याचे, भाजीवाल्याचे गाडे असतात. एखादं टपरीवजा हॉटेल असतं आणि त्या हॉटेलमध्ये सिनेमातल्या गाण्याचा कर्कश्श आवाज येतो. याच वस्तीत वावरणारे गुंड, मवाली गुडघ्यापर्यंत साडी घेतलेले तृतीयपंथीदेखील असतात. गुंडगिरी, रोगराईच्या वातावरणात वेश्यांचे जीवन व्यतित होताना दिसते.

**वेश्यावस्तीतील धार्मिकता**

वेश्या यल्लमादेवीवर श्रद्धा ठेवतात. एखादी बाई एका मोठ्या उथळ हाऱ्यात, फूटभर उंचीचा देवीचा मुखवटा असलेली, जरीकाठाची साडी नेसवलेली खोट्या दागिन्यांनी मढवलेली, ठसठशीत कुंकू लावलेली यल्लमा देवी आणते. सर्व वेश्यांचे श्रद्धास्थान असलेल्या या यल्लमा देवीभोवती सर्व वेश्या जमून डोक्यावर पदर घेऊन, हात जोडून, मिटल्या डोळ्यांनी मनोभावे नमस्कार करतात. हळद कुंकू लावून ओटी भरुन माथा टेकवतात. आपलं गाऱ्हाणं तिला सांगत होत्या. यल्लमा देवी नवसाला पावते असे त्यांना वाटते. यल्लमाविषयी लेखिका म्हणते, ''ज्या बाईला आजही साधं कुशीतून बाहेर पडण्याचं स्वातंत्र्य नाही, सामर्थ्य तर नाहीच नाही ती या बायकांना कशी काय मार्ग दाखवणार? या दलदलीतून कसं बाहेर काढणार?''[७] तरीही सर्व वेश्या तिची मनोभावे पूजा करतात. वेश्या यल्लमाला मानतात, त्यांच्या खोलीत, देवळीत यल्लमाची मूर्ती असते. त्या रोज तिला नमस्कार करतात.

केवळ सर्वसामान्य लोकच देव मानतात, असे नाही तर वेश्यासुद्धा देव मानतात. माणगावे देवाच्या संदर्भात आपल्या निवेदनात म्हणतात, 'जवळ जवळ प्रत्येक माणसाच्या मनात देवाला एक स्थान असतं. त्यांचा म्हणून एक नैतिक, आध्यात्मिक धर्म असतो. बाईला तर तो जास्तच असतो. ''देहविक्रय करणारी वेश्या असेल ती देवासमोर, देवीसमोर नाक घासते आणि आपली कर्मकहाणी सांगून आपल्याला त्यातून सोडविण्याची प्रार्थना करते. ही प्रार्थना असहाय्यतेतून अगतिकतेतून आलेली असते. ती भक्ती असतेच असं नाही पण मुक्तीसाठीची याचना असते...''[८] माणगावेंनी देवाविषयीचे आपले चिंतन आपल्या

निवेदनातून केलेले दिसते. वेश्या ही देखील माणूसच आहे. तिलादेखील मन, भावना आहेत. तिच्या मनात देखील देवाला स्थान आहे म्हणूनच तिच्या मनात क्षणभरासाठी का होईना भवितव्याची आशा निर्माण होते. एक सकारात्मक दृष्टी निर्माण होऊन ती नव्या उमेदीने जीवनाला सामोरी जाते.

**वेश्यांचे राहणीमान**

सर्वसामान्य मध्यमवर्गीय स्त्रियांपेक्षा वेश्यांचा पोशाख, जगण्याची पद्धत वेगळी आहे. त्या सकाळी साडेदहाच्या सुमारास आळसावलेल्या दिसत. संध्याकाळी जरा बऱ्या दिसतात. सहज दिसण्याएवढी पावडर, डोळ्यात भरणारं काजळ, ओठ रंगवलेले आणि काही जणींच्या केसात गजरा अशा प्रकारचं नटणं पूर्वीच्या वेश्यांचे असे. तसेच त्या भडक मेकअप, भडक रंगिबेरंगी कपडेही घालत नसत. आत्ताच्या वेश्यांना पूर्वीच्या वेश्यांप्रमाणेच पैस मिळतात. त्यातूनच त्यांना गुंड, मवाली, दलाल, पोलीस इत्यादींचे हप्ते व खोलीचे भाडे द्यावे लागतात. त्यांना पन्नास कधी पंचवीस रूपये मिळतात. त्यातून त्या वडापाव, मिसळ असं खातात. खोलीत जेवण करु देत नसल्याने हॉटेलमध्ये जाऊन जेवण्याची ऐपत नसल्याने त्यांना फास्ट फूडवर जगावे लागते. मात्र त्यांच्या दिसण्यात पूर्वीच्या वेश्येपेक्षा वेगळेपणा कविताला जाणवतो. बऱ्याच बायकांनी केस कापलेले, कपाळावर झुल्फे सोडलेली कविता पहाते. तसे त्या भडक रंगाच्या चुडीदार किंवा भडक रंगाची झुळझुळीत साडी नेसतात. ब्लाऊजचे किंवा ड्रेसचे गळे मोठे शिवलेले असतात. पोट, पाठ आणि उरोज स्पष्ट दिसावेत अशी ओढणी किंवा पदर घेतात. भडक मेकअप करतात. गिऱ्हाईकाला शरीराचं आव्हान देतात. या वेश्यांना कोणतं ना कोणतं व्यसन लागलेलं असतं हे सांगताना माणगावे लिहितात, ‘‘आता प्रत्येकाच्या तोंडात, पान, सुपारी, तंबाखू किंवा गुटखासदृश काहीतरी असल्यामुळे सगळ्यांची तोंड सतत हलत होती. बोलताना दारुचा आणि सिगारेटचाही भपका जाणवायचा.’’[१] सर्वसामान्य स्त्रियांपेक्षा वेगळ्या असणाऱ्या वेश्यांचं राहणीमानही वेगळं असतं. हे माणगावे परिणामकारकरित्या चित्रित करताना दिसतात.

**वेश्यांची संतती**

मराठी साहित्यात श्री. व्य. केतकर यांनी आपल्या कादंबऱ्यांतून वेश्या संततीबद्दल आपली मते मांडलेली दिसतात. त्याचप्रमाणे माणगावेंनी वेश्यांच्या जीवनावर आधारित 'शोध' कादंबरी लिहिताना वेश्यांच्या संततीचाही प्रश्न मांडलेला आहे. गुलाबी वेश्या वस्तीत रहात असताना तिला कळते की वेश्यांना मुलगा नको असतो, मुलगीच हवी असते. मुलगा झाला तर त्या मारुन टाकतात. याविषयी वेश्यावस्तीतली एक मावशी म्हणते, "आमच्यातल्या लई बाया असं करतात...! पोरग्याला पाण्यात बुडवून मारुन टाकत्यात नाहीतर कुठं तर गावाभाईर फेकून देत्यात! पोरीनला तेवढंच जगवित्यात. पोरगी म्हणजे आमचं भांडवल, ते जपायला नको मग? त्यावरच तर धंदा चालतो. आमाला पोरग्याचा काय उपेग? खायला कार आणि भुईला भार!"[१०] गुलाबीला वेश्या व्यवसाय करायला लावणाऱ्या मावशीला एक मुलगी व एक मुलगा होतो. तेंव्हा ती मुलग्याला मारुन टाकते. वेश्यांना मुलगीच हवी असते. कारण तीच तिच्या वंशाचा दिवा असते. म्हातारपणीची काठी असते. गुलाबीच्या सख्ख्या आईला मुलग्याबरोबर मुलगी चालते पण मावशीला मुलगीबरोबर मुलगा चालत नाही.

गुलाबीची मावशी आपल्या मुलीचं नाव शराबी ठेवते. कारण ती मोठी होऊन वेश्येचा धंदा करताना दारुची नशा जशी चढते तशी शराबीकडे आलेल्या गिऱ्हाईकाला शराबीची नशा चढून त्याने पुन्हा पुन्हा यावे व आपल्याला मालामाल करावे अशी तिची इच्छा असते. छोट्या शराबीला मावशी अफू पाजून तिला म्हाताऱ्या आईच्याजवळ कॉटखाली झोपवत असते. एक दिवस अफू जास्त दिल्याने ती मरते. मावशीला खूप दुःख होते. तरीही दुसऱ्या दिवशी ती गिऱ्हाईक घेते. सोन्याची खाण असलेली, म्हातारपणीची काठी असलेली शराबी वारली तरी मावशीला धंदा महत्त्वाचा वाटतो. शराबी वारल्याच्या दुसऱ्या दिवशी तिच्या आत्म्याला दुःख दिले म्हणून ती कडकडीत उपवास करते. गुलाबी आपली मुलगी शराबी हिला बोर्डिंग हायस्कुलमध्ये घालते. तेथे शराबीला वेश्येची मुलगी म्हणून मुलं हसतात. शिक्षक तिला बघून आपआपसात कुजबुजतात. काही बाई मात्र तिची आस्थेने चौकशी

करतात. एक दिवस सातवीत असणाऱ्या शराबीवर त्याच शाळेचे हेडमास्तर बलात्कार करतो. वेश्यांच्या मुलींना समाज उपभोगाची वस्तूच समजतो. त्यांना सर्वसामान्य मुलांप्रमाणे जगायचे असले तरी जगता येत नाही. त्यांच्या आयुष्याची फरफट होताना दिसते. तसेच वेश्यांकडे येणारे गिऱ्हाईक कोणत्याही जातीचे असते. त्यामुळे वेश्यांच्या पोटी जन्म घेणारी मुलं ही पाटील, इनामदार, कुलकर्णी इ. पैकी कोणाचीही असतात. पण त्यांना बापाचं नाव नसतं. अशाप्रकारे माणगावे यांनी वेश्यांच्या संततीचा, शिक्षणाचा, लग्नाचा, भवितव्याचा प्रश्न मांडलेला दिसतो.

**समाजाचा वेश्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन**

स्वत:चा देहविक्रय करुन वेश्याव्यवसाय करुन अर्थार्जन करणाऱ्या वेश्यांकडे समाज फार चांगल्या नजरेने पहात नाही. समाजातील सुसंस्कृत, मध्यमवर्गीय, पांढरपेशा समाज वेश्यांना नावे ठेवतो. वेश्येकडे जाणे चांगले समजले जात नाही. तरीही याच समाजातील लोक आपल्या शरीराची भूक भागविण्यासाठी वेश्यांकडे जात असतात. सभ्य घरातल्या स्त्रिया, मुली वेश्यांबरोबर बोलतही नाहीत. पण 'शोध' कादंबरीतील कविता गुलाबीशी मैत्री करते. तिच्यावर भरभरुन प्रेम करते. गुलाबीही आपले दु:ख कविताला सांगते. कविताने गुलाबीशी मैत्री केलेली कोणालाच आवडत नाही. कविताचे वडील गुलाबीशी तिने बोलू नये म्हणून तिला मारतात. शाळा बदलतात. कविताला शाळेत सोडायला, आणायला जातात. तसेच कविताची मैत्रिण अनुष्का तिच्याबरोबर बोलत नाही. कविताची आई वेश्यांना 'उंडग्या' पुरुषांना भुलतात असे म्हणते.

मध्यमवर्गीय, पांढरपेशा समाजातील व्यक्ती वेश्यांकडे तुच्छतेने पहाते. वेश्यांशी बोलणं, मैत्री करणं त्यांना अमान्य असतं. वेश्यांशी लग्न करण्यास कोणी तयार होत नाही. जर एखाद्याने धाडस करुन लग्न केलंच तर समज ते टिकू देत नाही. दयानंदने गुलाबीशी लग्न केले पण त्यांच्या घरातल्यांनी ते टिकू दिले नाही. गुलाबीला घरातून हाकलून काढले. दयानंदची आई त्याला सांगते, ''अशा बायकांना एका जागी संसार करवत नाही. रोज एका माणसाबरोबर सोकावलेल्या बायका, त्यांना एक नवरा पुरतोय होय? तू लगीन करुन

आणलास पण ती गेलीच आपल्या जातीवं!''[११] एका वेश्येला त्या सून म्हणून स्वीकारत नाहीत. सून, बहीण, भावजय इ. नात्यात समाज वेश्येला स्विकारत नाहीत. माणगावे या संदर्भात लिहितात, ''सर्वसामान्य... घरेलू... संसारी... नवरा... बायको... मुलांची कुटुंब व्यवस्था मानणारा समाज एका बाजूला तर वेश्यांचा बाजारी समाज दुसऱ्या बाजूला! संसारी पुरुष तिकडे जाऊ शकतो; जातो. शरीरसुखासाठी वेश्येच्या उंबऱ्यात उजळ माथ्याने जा-ये करतो... पण तिथल्या बाईला तो इथं आणू शकत नाही. आपल्या घरात तिला स्थान देऊ शकत नाही. तिचं पत्नीपद समाजच काय घरही सन्मानानं स्विकारु शकत नाही.''[१२] वेश्यांनी लग्न करणं त्यांच्यासाठी कशाप्रकारे घातक आहे हे सांगताना गुलाबीला मावशी म्हणते, 'इथून लग्न करुन गेलेल्या मुलींना त्यांचे नवरे पुन्हा धंद्यातच बसवतात किंवा स्वतःचा तिच्यातला रस संपला की कुठेतरी विकून टाकतात... समाज, नवरा, त्यांचे कुटुंबिय तिचा स्विकार करत नाही. समाज त्यांना मानाचे स्थान देत नाही.

गुलाबीवर संरक्षण करणारा पोलीसच बलात्कार करतो तर शराबीवर सरस्वतीचा पुत्र हेडमास्तर बलात्कार करतो. त्यांच्या दृष्टीने वेश्या म्हणजे उपभोगाची वस्तूच असते. खेळण्याचं एक साधन असते. काही तरुण मुलं वेश्यावस्तीत जाऊन एडस् नियंत्रणाखाली काम करतात. एडस्‌विषयी जनजागृती करतात. निरोधाची पाकीटं पुरवतात. समाजसेवा करतात. त्या मुलांचे आई-वडील त्यांना या कार्यापासून परावृत करीत नाहीत. अशीही काही समाज घटक समाजात आढळतात. पण माणगावे विशेष करुन वेश्यांना मन, भावना असतात हे अमान्य करणाराच समाज मोठ्या प्रमाणात आहे हे दर्शविताना दिसतात.

**वेश्यांचा समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोण**

मध्यमवर्गीय पांढरपेशा समाज एका विशिष्ट दृष्टिकोणातून वेश्यांकडे पहातो. त्याचप्रमाणे वेश्यादेखील आपल्या विशिष्ट दृष्टिकोणातून समाजाकडे पहात असतात. मध्यमवर्गीय समाज – 'एडस्' रोग पसरविण्यासाठी वेश्या कारणीभूत आहेत', असे समजतो. पण वेश्यांना तसे वाटत नाही. गुलाबी कविताला हे सांगताना म्हणते, ''समाजात हा रोग आम्ही पसरवतो म्हणून लोक आमच्या नावानं बोंबलतात. पण हा रोग आम्हाला कोणी

दिला? याचा विचार नाही करत. आम्ही कुठं गेलो होतो हा रोग आणायला? आम्ही तर इथंच आहोत? वस्ती सोडून आम्ही कुठं जात नाही, मग कुणी दिली ही मरणभेट... लोकांनीच ना?''[१३] अशाप्रकारे गुलाबीसारख्या वेश्या समाजालाच दोष देतात. शराबीला एडस् झाला तो या मध्यमवर्गीय समाजातील पुरुषांमुळे अशी तक्रार गुलाबी करते. आपल्या घरातील माणसांची काळजी या पुरुषांना असत नाही, असे गुलाबीचे म्हणणे आहे. वेश्या स्वत: होऊन पुरुषांच्या घरी त्यांना बोलवायला जात नाहीत. ते स्वत:हून वेश्यांकडे येत असतात. ते निरोधही वापरत नाहीत त्यामुळे स्वत:ही रोगी होतात व वेश्यांच्यातही जंतू पेरुन जातात. होळी, रंगपंचमी, एकतीस डिसेंबरची रात्र म्हणजे वेश्यांच्या धंद्याची दिवाळीपण असते आणि होळीपण असते. दारु प्यालेली, नशा चढणाऱ्या पुड्या खाल्लेली तरुण मुलं राक्षसासारखी तुटून पडतात. त्यामुळे वेश्यांना पैसे मिळाले तरी निम्मे औषधासाठीच खर्च होतात.

सुसंस्कृत, संसारी पुरुष या वेश्यांकडे येतो जातो पण वेश्यांनी त्यांच्या घरी ये-जा केलेली त्यांना आवडत नाही. असे असूनही वेश्यांना त्यांच्याविषयी कोणतीही तक्रार नसते. वेश्यांना आपणही लग्न करून संसार करावे असे वाटते. आपल्याबरोबर लग्न करणारे पुरुष नंतर आपल्याला विकतात, हाकलून देतात. मग आपल्याला आत्महत्या करावी लागते किंवा वेश्या व्यवसायच करावा लागतो. या सर्व गोष्टींची त्यांना कल्पना असते. त्यामुळे याच दृष्टिकोणातून त्या वेश्येशी लग्न करु इच्छित असणाऱ्या पुरुषाकडे पहातात.

**वेश्यांचे समाजातील स्थान**

वेश्या समाजाचा एक घटक असूनही ती समाजापासून वेगळी आहे. वेश्यांना स्वतंत्र चेहरा असूनही त्यांना स्वतंत्र अस्तित्व, ओळख असत नाही. त्यांची ओळख एकच असते 'वेश्या.' वेश्यांना समाजात अप्रतिष्ठित समजलं जातं. 'वेश्या' ही काही काळाची करमणूकच असते. याविषयी माणगावे 'शोध' कादंबरीत लिहतात, ''वेश्या म्हणजे घडीभरची करमणूक! वासना शमविण्याचं एक साधन! रोखठोक व्यवहार ठरवून घरकामासाठी खेळायला घेतलेलं खेळणं! या खेळण्याचं शरीर हेच भांडवल!... तिचा संबंध पैशाशी! गिऱ्हाईकाचा संबंध

तिच्या शरीराशी! स्वतःच्या वासनेपूर्तीचं एक माध्यम म्हणून गिऱ्हाईक तिच्याकडे पहाते. पैसे देऊन शरीर उपभोगलं की संबंध संपला. तिच्याविषयी दया, माया, प्रेम, आपुलकी ठेवण्याची गरज नसते. गिऱ्हाईकाला दिलेल्या पैशाची वसुली झाली की संपले!''[१४] वेश्येने आपल्याला शरीरसुख द्यावं त्या बदल्यात पैसे घ्यावे एवढ्या व्यवहारासाठीच तिची उपयुक्तता असते. पुरुषांना फक्त तिचं शरीर हवं असतं. तिच्या इच्छा, मन, भावना यांच्याशी त्यांना काहीही देणंघेणं नसतं.

समाजातील पुरूषांना वेश्येच्या शरीराचा उपभोग घेणं एवढंच माहित असतं. म्हणूनच माणगावे म्हणतात, ''विचार, बुद्धी, भावना एवढंच काय स्वतःचा वेगळा चेहरासुद्धा नसलेल्या या बायका... यांची जात फक्त वेश्या! गिऱ्हाईकाला शरीरसुख देणं हाच यांचा धर्म. घर, संसार, मुलं, बाळं या सर्व गोष्टी सुखापासून त्यांना वंचित रहावं लागतं.''[१५] वेश्यांच्या शरीराशीच, तारुण्याशी संबंध ठेवणारा पुरुष तिच्याकडे जातो पण तिला आपल्या घरी नेऊ शकत नाही. सभ्य घरातील स्त्रिया त्यांच्याकडे तुच्छतेने पहातात. त्यांच्याशी बोलणेसुद्धा वाईट समजले जाते. एकंदरीत वेश्यांना समाजात खालच्या दर्जाचे, अप्रतिष्ठित स्वरूपाचे स्थान दिले जाते असे दिसते.

**वेश्याव्यवसाय**

समाजात बरेच व्यापारी आपला आपला व्यवसाय करुन फायदा मिळवत असतात. त्याचबरोबर समाजाला त्यांच्याकडून पैसे घेऊन त्यांना सेवा पुरवत असतात. किराणामाल, स्टेशनरी, गारमेण्टस इ. विविध व्यवसाय समाजात आढळतात. या सर्व व्यवसायापेक्षा वेगळा व अप्रतिष्ठित समजला जाणारा वेश्या व्यवसाय आहे. मागणावेंनी आपल्या 'शोध' या कादंबरीत यावर चिंतनशील भाष्य केलेले दिसते. मागणावे आपल्या निवेदनात लिहितात, विकत किंवा अन्य मार्गाने पकडून आणलेल्या मुलींना मावश्या वेश्या व्यवसाय करायला भाग पाडतात. वेश्या व्यवसायातही मावशी आठ-दहा, वीस-पंचवीस किंवा त्याहूनही अधिक पोरींकडून स्वतःच्या अधिकाराखाली हा धंदा करत असते. प्रत्यक्ष धंदा पोरी करतात पण पोरींना फारसं काही कळत नाही. वेश्यांना आलेल्या पैशातून मावशीला खोली भाडं, दलाल,

गुंड, दादा, पोलीस, औषधपाणी यालाच खर्च करावे लागतात. यामधून पंधरा-वीस, पंचवीस व जास्तीत जास्त पन्नास रुपये उरतात. खोलीत स्वयंपाक करुन देत नसल्याने बाहेरुन जेवण मागवावे लागते किंवा वडापाव मिसळ खाऊन जगावे लागते. बाहेरचं जेवण, चहा, नाश्ता, पान-सुपारी, साड्या, खोटे दागिने, लिपस्टिक इ. खर्चही भागत नाही म्हणून पोटभर जेवण मिळत नाही. मात्र पान, तंबाखू, गुटख्यासारख्या पुड्या किंवा थोडी दारू त्यांना लागतेच....! वेश्या व्यवसाय एकूणच वेश्यांच्या मनाची, शरीराची, पोटाची फरफट होते, असे माणगावेंना सांगायचे आहे असे दिसते.

वेश्यांकडे येणारे गिऱ्हाईक वखवखलेल्या उपाशी भिकाऱ्यासारखं असतं. पैशाच्या मोबदल्यात त्याला खेळणं म्हणून वेश्येचे शरीर हवे असते. तिच्या मनाशी त्याला काहीही देणंघेणं नसतं, खेळणं मोडेल म्हणून का होईना त्या खेळण्याची काळजी घेतली जाते पण तेवढीही काळजी घेण्याची गिऱ्हाईकाची बांधिलकी नसते. शरीराचा चोळामोळा करुन कुस्करून ओरबडून, आपली पाशवी वासना त्याला शमवायची असते. वेश्या ही मस्ती जिरवण्याचे, मजा करण्याचे बाजारी साधन असते. तासा-दोन तासासाठी भाडोत्री घेतलेली वस्तू, एवढीच तिची किंमत असते अशा बाजाराला स्वप्ननगरी का म्हणतात असा प्रश्न माणगावेंना पडतो.

नीलम माणगावे यांनी वेश्या व्यवसायात वेश्या कशा प्रकारे गिऱ्हाईकाला आकृष्ट करतात हे सांगताना त्या म्हणतात, 'एखाद्या शिळ्या भाजीवर पाणी मारुन ताजे केलेल्या भाजीपाल्यावर जसे गिऱ्हाईक तुटून पडते तसे वेश्या आपल्या थकलेल्या चेहऱ्यावर पावडर लावून, आव्हानात्मक नजरा आणि चाळवणाऱ्या हावभावांचे पाणी शिंपून गिऱ्हाईकांना आपल्याकडे खेचून घेतात.' माणगावे पुढे म्हणतात, ''गिऱ्हाईकांच्या माध्यमातून मग समाजातली बिभत्स वखवख, शरीराची पिसाळलेली उपासमार, मनातला खदखदणारा राग, द्वेषाचे विषारी फुत्कार, मत्सराचा ज्वालाग्राही उन्माद इथं रोता केला जातो आणि मग निचरा झालेली ही माणसं आपापल्या मार्गानी आपापल्या जगात निघून जातात.''[१६]

वेश्याव्यवसाय करवून घेणाऱ्या गुलाबीच्या मावशीला मुलगी शराबी होते, ती वारते त्याच्या दुसऱ्या दिवशी मावशी गिऱ्हाईक घेते कारण तीला भावनेपेक्षा धंदा महत्त्वाचा वाटतो. खरंतर आपल्या पोटची पोरगी मेली म्हणून तिला दुःख झालेले होते, पण मावशीच्या मते 'आधी दुसऱ्याची सोय मग आपलं सुख-दुःख, धंदा भावनेपेक्षा श्रमावर, कष्टावर अधिक चालतो. जो गिऱ्हाईकाचं समाधान करतो; त्याची गरज आधी बघतो त्याला काहीही कमी पडत नाही' त्यामुळे मावशी आपली मोत्याची खाण, म्हातारपणाची काठी आपली मुलगी वारली तरी दुसऱ्याच दिवशी गिऱ्हाईक घेते.

वेश्याव्यवसाय करणाऱ्या वेश्या अत्यंत प्रामाणिकपणे आपला व्यवसाय करतात. कोणाचीही फ सवणूक करत नाहीत. गुलाबी कविताला आपल्या व्यवसायातील प्रामाणिकपणाबद्दल सांगताना म्हणजे, "दारू पिऊन तर्रर झालेल्या गिऱ्हाईकाला तर उचलून बाहेर काढावं लागतं, कितीतरी गिऱ्हाईकांच्या गळ्यात सोन्याची चेन असते, बोटात अंगठी असते, खिशात..पाकिटात भरपूर पैसे असतात पण कधी आम्ही त्याच्यावर हात मारत नाही. आम्हाला ते शक्य असतं, पण आम्ही कुणाचा विश्वासघात करीत नाही. हा गिऱ्हाईकाकडून कधीकधी हक्कानं मागून जास्त पैसे घेतो पण त्यांना लूटत नाही. आमचा धंदा चोख असतो. दाम रेख घेतो पण कामसुद्धा तसंच इमानीनं करतो."[१७]

गुलाबीनं संपूर्ण आयुष्य वेश्याव्यवसाय करण्यात घालवलं त्यामुळे तिला वेश्या व्यवसायाची पूर्ण माहिती होती. पूर्वीच्या वेश्या व्यवसायात आणि आत्ताच्या वेश्या व्यवसायात बराच फ रक आहे असे मी कविताला सांगते. पूर्वी बायका स्वतंत्र्यपणे धंदा करत. पोलिस, गुंडाना थोडे पैसे देवून त्यांना थोपवत पण आत्ता या धंद्याचा मोठा व्यवसाय झाला आहे. नियोजनबद्ध चालला जाणारा व्यवसाय. या व्यवसायातील पोरीचे स्वातंत्र्य संपले आहे. त्यांच्या शरीराचा, तारुण्याचा वापर व्यवसायातले भांडवल म्हणून वापरले जाऊ लागले आहे.

वेश्या व्यवसाय म्हणजे रोखठोक व्यवहार करणारा बाजार आहे. एक नियोजित लाखोंची उलाढाल करणारा व्यवसाय आहे. माणगावे वेश्या व्यवसायाविषयीच्या आपल्या

चिंतनात लिहितात, ''धंदा करणाऱ्या पोरी....त्यांना हाताशी ठेवून त्यांच्याकडून धंदा करवून घेणाऱ्या त्यांच्या मावशा....मधले दलाल...हप्ता मागणारे गुंड.... आणि हप्ता खाणारे पोलीस.... आणखी बरचं... औषध-पाणी गर्भपात...निरोधाची पाकीटं... अंमली पदार्थ...''[१८] गुलाबी, शराबीसारख्या स्त्रिया करीत असलेला हा वेश्या व्यवसाय चालतो तो भाग, ठिकाण फारसं चांगलं असत नाही. गलिच्छ वस्तीमध्ये हा व्यवसाय चालतो. रोगराई, गुंडगिरी, मवाली, अस्वच्छता, उपासमार यामध्ये हा व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया पिचताना दिसतात. वेश्येचा धंदा करुन स्वत:ला फाडून घेऊन सुद्धा त्यांना पोटभर अन्न मिळत नाही. प्रतिष्ठा तर अजिबात मिळत नाही, उलट त्यांना अपमान, अवहेलना, उपासमार, मनाची व शरीराची फरपट यांना सामोरे जावे लागते. त्यांना संसार, मुलबाळं काहीही नसतात. जी मुलं होतात, त्यांना बापाचे नाव नसते. त्यांना मानाने जगता येत नाही. वेश्यांच्या मुलींनी वेगळा चांगला मार्ग पत्करावा म्हटले तर समाज त्यांना स्विकारत नाही. शेवटी वेश्यांच्या मुलींना वेश्या व्यवसायच स्वीकारावा लागतो. या चक्रातून त्यांची सुटका होत नाही. एकूणच वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना या व्यवसायात तोटाच सहन करावा लागतो, याचे अत्यंत परिणामकारक चित्रण माणगावेंनी आपल्या 'शोध' या कादंबरीत केलेले दिसून येते.

**स्त्रिया वेश्या व्यवसायाकडे का वळतात ?**

नीलम माणगावे यांच्या ' शोध 'या कादंबरीत गुलाबी या वेश्येच्या जीवनाची शोकांतिका चित्रित केली आहे. या स्त्रिया वेश्या व्यवसायात कोठून येतात. याबद्दल लिहिताना माणगावे म्हणतात, "कुठूनं कुठनं आल्या असतील या बायका? गरीब असहाय्य परिस्थितीतून आलेल्या... आई-वडिलांनी विकलेल्या घरच्यांनी दुर्लक्ष केलेल्या... मनाविरुध्द लग्न झाल्याने स्वतःहून घरातून बाहेर पडलेल्या ... नवरा इतर नातेवाईकांकडून फसवल्या गेलेल्या .... विधवेचा लैंगिक छळ झालेल्या.... बलात्कार झालेल्या ... घरातून पळालेल्या.... लहान वयात प्रेमाला किंवा शारीरिक मोहाला बळी पडलेल्या सिनेमात काम करण्यासाठी घर सोडून पळून गेलेल्या .. . देवाला सोडलेल्या ... देवाची सेवा म्हणून धर्मान फसवलेल्या आणि शेवटी दलाला मार्फत इथ आलेल्या... कारणं अनेक दुर्दैव एक ... घरच्यांनी नाकारलेल्या आणि मनानं मेलेल्या या बायका म्हणूनच एकसारख्या वाटतात उगीच चालतात बोलतात, फिरतात म्हणून यांना जिवंत म्हणायचं एवढंच!"

गुलाबी कविताला दुर्दैवी वेश्यांची कहाणी सांगताना सांगते की, काही मुली या वेश्याव्यवसाय करण्याला नकार देतात तेंव्हा विकत आणणा-या मावश्या त्यांना मारहान करतात. एखाद्या पुरुषाकडून तिच्यावर बलात्कार केला जातो. शेवटी आपल्याबरोबर आता कोण लग्न करणार? या विवंचनेत त्या वेश्या व्यवसाय पत्करतात. आत्महत्या करण्याशिवाय त्यांच्यासमोर पर्याय रहात नाही.

एखाद्या उमद्या तरुणाने वेश्येशी विवाह केला तरी त्याच्या घरचे तिला हाकलून देतात. समाज तिला स्वीकारत नाही. शेवटी तिला वेश्या व्यवसायच करणे भाग पडते. 'शोध' मधील गुलाबीला ती नऊ वर्षाची असताना मावशीन शंभर रुपयात विकत आणते व वयात आल्याबरोबर तिला धंद्याला लावते गुलाबीबरोबर दयानंद गायकवाड हा खानदानी श्रीमंत मुलगा विवाह करतो. पण त्याच्या घरातले तिचा स्वीकार करत नाहीत. ते तिला घरातून

हाकलून देतात. ती मावशीकडे जाते. मावशी तिला धंदा करायला सांगते. ती नकार देताच तिला घरातून हाकलून देते. भीक मागत फिरतांना पोलीसच तिच्यावर बलात्कार करतो. वणवण करत फिरण्यापेक्षा पोलिसांनी केली तशी फसवणूक होण्यापेक्षा तिला मावशीकडे जाणे योग्य वाटते. ' समाजात होते ती लुबाडणूक , बाहेर फुकटात लुटतात. मावशीकडे वेश्या व्यवसाय करुन पोट तरी भरते ?' अशा विचाराने ती मावशीकडे पुन्हा वेश्याव्यवसायच करायला लागते. परिस्थितीतीमुळे शेवटी ती वेश्याव्यवसायाकडेच वळते. एकदा वेश्याव्यवसायात पडलेल्या स्त्रियांना समाज स्वीकारत नाही. त्यांना अखेरपर्यंत वेश्या व्यवसायच करावा लागतो.

गुलाबी आपली जशी अवस्था झाली तशी शराबीची होऊ नये म्हणून तिला बोर्डिंग हायस्कूलमध्ये टाकते. त्या शाळेतील हेडमास्तरच तिच्यावर बलात्कार करतो. शाळा सोडून शराबी आईकडे निघून येते. शेवटी ती पोटासाठी आईच्या वेश्या व्यवसायाकडे वळते.

**वेश्यांचा अंत**

वेश्यांना आपला देहविक्रय करुन मिळालेल्या पैशातून काही पैसे पोलीस, गुंड इ. चे हप्ते तसेच खोली भाडे यासाठी खर्च करावे लागतात. त्यामुळे त्यांना पोटभर अन्न मिळत नाही. मनाची, शरीराची फरकट झालेली असल्याने त्या पन्नासाव्या वर्षीच वृध्द होतात. त्यांच्या मुली जर चांगल्या असतील तर आपल्या आईला सांभाळतात अन्यथा घरातून हाकलून देतात. पोटासाठी मग तिला भीक मागावी लागते. अन्यथा आत्महत्या करावी लागते.

शराबीदेखील एड्स या रोगाला बळी पडली असताना ती पोट भरण्यासाठी गि-हाईक घेते. पण जेंव्हा तिला गि-हाईक घेणे शक्य होत नाही, तेंव्हा घरात पैसाही येत नाही. दलालाला कमीशन मिळाले नसल्याने तो शराबी व गुलाबीला खोली सोडायला सांगतो. रोगट शरीर घेऊन जायचं कुठे ? खायचं काय१ रहायचं कुठे ? असे प्रश्न त्यांच्यासमोर उभे राहतात.

शेवटी त्या विष घेऊन आत्महत्या करतात. महानगरपालिकेची शववाहिका येवून शराबी, गुलाबीचा मृतदेह बेवारस म्हणून घेऊन जाते. अशा प्रकारे वेश्यांचा अंत हा बेवारशासारखा होताना दिसतो.

**कारणीभूत कोण?**

गुलाबी या वेश्येचा जन्मच गरीबी, अज्ञान आणि अंधश्रध्देतून झालेला दिसतो. गुलाबीच्या आईने शंभर रुपयासाठी गुलाबीला एका वेश्येला विकले आहे. फसवून आणलेल्या, देवाला सोडलेल्या मुलींना आणून मावश्या त्यांना वेश्याव्यवसाय करायला भाग पाडताना दिसतात.

एखादी स्त्री एकटी राहत असेल तर पुरुषप्रधान संस्कृतीत तिला जगणे अवघड होऊन जाते. तिच्या एकटेपणाचा, अगतिकतेचा फायदा घेतात. तिला वाममार्गाला जायला भाग पाडतात. गुलाबीला सर्वसामान्य स्त्री प्रमाणे जीवन जगण्याची इच्छा आहे पण समाज तिला तसे जगू देत नाही. दयानंद गायकवाड बरोबर लग्न केले तरी समाज तिला स्वीकारत नाही. तिच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन पोलीस तिच्यावर बलात्कार करतो तेंव्हा गुलाबी म्हणते 'पुरुष आमच्याकडे घटकाभरासाठी येतात आमच्या देहाचे पैसे देऊन भोग घेतात पण बाहेरच्या जगात मात्र बलात्कार करुन बायकांना फुकट लूटतात.' असे फुकट लुटण्यापेक्षा वेश्या व्यवसाय केलेला बरा असे गुलाबीला वाटते. शराबी देखील सर्वसामान्य मुलींप्रमाणे शाळेत जाऊन शिकू पहाते पण समाज तेथेही तिला त्रास देतो. शेवटी ती ही वेश्या व्यवसाय करायला लागते. जर दयानंदच्या घरच्यानी गुलाबीचा मनापासून स्वीकार केला असता तर गुलाबी व शराबीवर ही वेळ आली नसती. गुलाबी व शराबी या दोघींच्या अंताला समाजव्यवस्था कारणीभूत ठरलेली दिसते. मवाली, गुंड,पोलीस या सर्वांची मिळून एक यंत्रणा वेश्यांना आपल्याला हवं तस नाचवताना दिसते. शराबी व गुलाबी सारख्या वेश्या समाजव्यवस्थेच्या बळी ठरलेल्या दिसतात.

## जुनी पिढी व नवी पिढी तफावत

'शोध' कादंबरीत गुलाबी, कविता व कविताचा नवरा ही जुन्या पिढीतील आहेत. शराबी,अपर्णा, सानंद ही नव्या पिढीतील आहेत. गुलाबी कविताला आपल्या हक्कांसाठी भांडण माहीत नाही. त्याची आजच्या पिढीएवढी पुरागामी विचारसरणी नाही असे दिसते. सानंद, अपर्णा व शराबी धाडसीवृत्तीची जुन्या पिढीपेक्षा अधिक विचार करणारी पिढी दिसते. पूर्वी कुटुंबामध्ये वडीलांच्या समोर मुली बोलत नसत. शोध मधील कौटुंबिक वातावरण खेळीमेळीचे दिसते. तेथे सानंद व अपर्णा आपल्याला जे वाटते ते निःसंकोचपणे आपल्या आई वडीलांना सांगताना दिसतात. आपले विचार, मते ठामपणे मांडताना दिसतात. कविताच्या काळात मुलींना फारसे शिक्षण दिले जात नव्हते. आता शिक्षणाचा प्रसार झाल्याने मोठ्या प्रमाणात मुली शिक्षण घेताना दिसतात. एकदा कविता व अपर्णा वेश्यावस्तीत जाताना त्यांच्या ओळखीचे वसंताकाका तेथे भेटतात. कुत्सितपणे वेश्यावस्तीत येण्याचे कारण विचारतात त्यावेळेस कविता खूप घाबरते पण अपर्णा न घाबरता त्यांना सडेतोड उत्तर देते. काका तिला घाबरुन पळून जातात हे पाहून कविता म्हणते, "अपर्णाच्या धाडसाचं मला कौतुक वाटलं. आपल्याला का एवढ धाडस होत नाही? आपण का एवढ घाबरतो त्यांना? मनात आल हा पिढीचा फरक शिवाय शिक्षणाने आलेला आत्मविश्वास, यांना बोलण्याची धिटाई आणि विचाराची स्पष्टता देतो. आपल्या पिढीतल्या आपल्या सारख्या स्त्रियांना ते शक्य नाही. "

गुलाबीच्या व शराबीच्या काळात देखील तफावत दिसते. गुलाबीच्या काळात बायका भडक मेकअप करत नसत. त्याचप्रमाणे त्या स्वतंत्रपणे व्यवसाय करीत असत. पण शराबीच्या काळात खूपच बदल झालेला दिसतो. भडक मेकअप, पाठ, उरोज दिसणारे ब्लाऊज ड्रेस त्या घालतात. दारु, गुटखा यासारखी व्यसने त्यांना आहेत असे दिसते. तर गुंड, मावश्या, पोलीस या एका विशिष्ठ यंत्रणेत त्या वावरताना दिसतात.

**लोकसंख्या वाढीतून निर्माण झालेल्या समस्या.**

गुलाबी वेश्या बनली ती लोकसंख्यावाढीमुळे, कारण गुलाबीच्या वडीलांना मुलगा हवा होता म्हणून त्यांनी गुलाबीच्या आईवर सात बाळंतपण लादली. गरीबीत मुलगा वंशाचा दिवा या अंधश्रध्देपोटी सात मुलींना जन्म देऊन तो मेला. कुटुंबाची सर्व जबाबदारी गुलाबीच्या आईवर येऊन पडली. सात पोट भरण्यासाठी ती कष्ट उपसू लागली. कोणत्याही मुलीला ती शाळेत घालू शकत नव्हती . तिची तेवढी ऐपतच नव्हती. त्यामुळे मुली निरक्षर राहिलेल्या दिसतात. खुप कष्ट उपसूनही पोट भरु शकत नव्हती. राहण्याचे एक ठिकाण नसल्यामुळे, मिळालेली कामे सुटत असल्याने तिच्यावर भीक मागण्याची पाळी आली. शेवटी तिला आपल्या गुलाबी या मुलीला एका बाईला शंभर रुपयांसाठी विकावे लागले. नंतर गुलाबीला आयुष्यभर वेश्या म्हणून खस्ता खात जगावे लागले.

लोकसंख्या वाढल्याने शहरीकरण झपाट्याने वाढले. राहण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला अशा वेळेस बिल्डर वस्त्या पाडून त्या ठिकाणी इमारती बांधू लागले. गुलाबी ज्या वेश्या वस्तीत राहत होती त्या वेश्यांना तेथून हाकलून देऊन पर्यायी जागा उपलब्ध करुन न देता तेथे हेमंत कोठारी यांनी मोठी इमारत बांधलेली दिसते. त्याचबरोबर गुंडगिरी , हप्ता मागणारे मवाली, पोलीस यांच्यातही वाढ झालेली दिसते. गरीब, असहाय्य लोकांना यांचा त्रास सहन करायला लागलेला दिसतो. लोकसंख्या वाढीमुळे निर्माण झालेला भ्रष्टाचार , अज्ञान, दारिद्रय, निरक्षरता इ. समस्यांचे चित्रण 'शोध' मध्ये आलेले दिसते.

**वाङ्.मयीन वैशिष्ट्ये**

कादंबरीचा पट तसा विस्तृत असतो. कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण व भाषाशैली या चार प्रमुख घटकांच्या आधारे 'शोध' कादंबरीत वाङ्.मयीन वैशिष्ट्ये अभ्यासणार आहोत.

**कथानक**

"कथानक अधिक चित्तवेध होण्यासाठी त्यात समरप्रसंग असवा,विरोधी पक्षाचे द्वंद्व असावे". असे ना.सि. फडके म्हणतात. 'शोध' कादंबरीतील कविता बालपणी

एका बालवेश्येच्या प्रेमात पडते. तीस-पस्तीस वर्षानंतर पुन्हा तिच्या नव-याच्या बदलीच्या निमित्ताने ती त्या गावी येते. गुलाबीचा शोध घेताना कविताला खूप प्रकारची माणसं भेटतात. कविता वेश्याच्या विषयी चौकशी करीत असल्याने तिला आंबटशौकीनांच्या नजरेला सामोरे जावे लागते. तरीही कविता गुलाबीचा शोध घेते.

कविताला लालबत्ती विभागात गुलाबीची मुलगी शराबी भेटते. शराबी कविताला घेऊन आपल्या खोलीवर येते. तेंव्हा गुलाबी आपली करुण कथा कविताला सांगते. दयानंद गायकवाड नावाच्या एका खानदानी उमद्या तरुणाने तिच्याशी लग्न केलेले असते. पण त्याच्या घरचे ति ती वेश्या आहे समजल्यावर घरातून हाकलून देतात. ती मावशीकडे येते तेंव्हा मावशी तिला धंदा करायला सांगते. ती नकार देताच मावशी देखील तिला घरातून हाकलून देते. एकटीला पाहून एक पोलीस तिच्यावर बलात्कार करतो. तेंव्हा तिला भीक मागून पोट भरावे लागते. अशा अवस्थेत आपण गरोदर असल्याचे तिला समजते. ती ही बातमी सांगण्यासाठी दयानंदच्या घरी म्हणजे आपल्या सासरी येते. तर तेथे सासू तिला दयानंद वारल्याचे पटवून देते व घरातून हाकलून देते. मग गुलाबी मावशीकडे येते व वेश्याव्यवसाय करायला लागते. तिच्या मनात आत्महत्येचा विचार येतो पण पोटातल्या बाळासाठी ती जगायचं ठरवते. मावशीकडून सुटका व्हावी म्हणून ती कल्लादादाकडे स्वतंत्र व्यवसाय सुरु करते. कल्लादादा तिला "गुरु" ची भेट घालून देतो गुरु तिला स्वखर्चाने कॉट, गादी इ. सामान आणून देतो. लालबत्ती विभागात भाड्याने खोली बघून देतो. गुलाबीसाठी गि-हाईक आणतो. गुरु छक्का असल्याने गुलाबीला त्याच्यापासून धोका नसतो.

लालबत्ती विभागात गुलाबीचा धंदा चांगला चालतो. तेथेच गुलाबीला शराबी ही मुलगी होते. शराबीला बोर्डींग हायस्कूल मध्ये घालते. त्याच शाळेचा हेडमास्तर सातवीतल्या शराबीवर बलात्कार करतो. या घटनेमुळे कोठेही गेले तरी आपली हीच अवस्था होणार या विचाराने शराबी शाळा सोडून आईचा धंदा करायला लागते. शराबीला एड्स होतो ती धंदा करते. पोटासाठी, आईच्या औषधोपचारासाठी तिला धंदा करणे भाग पडते.

कविता गुलाबीची अवस्था पाहून अस्वस्थ होते. गुलाबी व शराबीला जमेल तेवढी मदत करते. कविताचे घराकडे दूर्लक्ष होते. एक दिवस शराबी व गुलाबी आजारी पडतात. शराबी गि-हाईक घेऊ शकत नाही त्यामुळे गुंडदादा शराबी व गुलाबीला खोली सोडायला सांगतो. कविता अशावेळी त्यांना वृध्दाश्रमात ठेवण्यासाठी प्रयत्न करते. ते शक्य झाले नाही तर आपले स्त्रीधन विकून येणा-या पैशातून खोली भाड्याने घेण्याचा विचार करते. पण गुलाबी व शराबीने जगाचा निरोप घेतल्याचे पाहून ती खूप दु:खी होते. घरात येऊन अपर्णाच्या गळयात पडून रडते. गुलाबी, शराबीने विष घेऊन आत्महत्या केलेली पाहून क्षणभर कविताला "सुटल्या दोघी आणि मी पण " असेही वाटते.

**व्यक्तिरेखा**

"कादंबरीतील पात्रे वास्तव व जिवंत असवीत व त्याचे वर्तन स्वाभावीक व सुसंगत असावे, कादंबरीकाराने आपली पात्र वाचकांच्या समोर मुर्तिमंत उभी केली पाहिजेत. " लेखिका त्यांच्या कादंबरीतील पात्र वाचकांच्या डोळयांसमोर उभी करताना दिसतात.

**गुलाबी**

गुलाबी या व्यक्तिरेखेभोवती सर्व कथानक फिरताना दिसते. तिला लहानपणापासून मरेपर्यंत संकटांना सामोरे जावे लागले आहे. तिला तिच्या आईने परिस्थितीला कंटाळून अवघ्या शंभर रुपयांना एका वेश्येला विकून टाकले. गुलाबीला वडिलांचे कधी प्रेम मिळालेले नाही. ज्या वयात खेळायचे बागडायचे त्या वयातच तिला आपल्या धाकट्या भावंडाना सांभाळावे लागते. वयात आल्यावर मावशी तिला वेश्या व्यवसाय करायला भाग पाडते. अशातच तिला कविता नावाची चांगली मैत्रिण भेटत. गुलाबी प्रथमपासूनच दु:खाच्या फे-यात फिरतांना दिसते.

गुलाबी प्रेमळ असल्याने वेश्या व्यवसाय करायला लावणा-या मावशीवर तिच्या मुलीवर शराबीवर ती प्रेम करताना दिसते. शराबी मरते तेंव्हा तिला अतोनात दु:ख होते. जेंव्हा मावशी शराबी वारल्यानंतर लगेचच दुस-या दिवशी गि-हाईक आणते तेंव्हा ती स्पष्ट

नकार देते. पण मावशीपुढे तिचे काहीही चालत नाही. गुलाबीच्या आयुष्यात तिच्यावर प्रेम करणारा दयानंद गायकवाड येतो. तो तिच्याशी लग्न करतो. गुलाबीला संसाराची ओढ आहे. तिला सर्वसामान्य स्त्री प्रमाणे जगण्याची इच्छा आहे. गुलाबी प्रामाणिक, सात्विक असल्याने दयानंदने आपण वेश्या असल्याचे लपवणे तिला पटत नाही. म्हणून ती आपल्या सासूला आपण वेश्या असल्याचे सांगते. या प्रामाणिकपणाचे बक्षिसही तिला मिळते. सासू तिला घरातून हाकलून लावते. गुलाबीला दुःखाच्या फे-यात अडकावे लागते. पोलीस तिच्यावर बलात्कार करतो. ती पून्हा मावशीकडे येते. नियती गुलाबीला वेश्या व्यवसायच करायला लावते.

गुलाबीची मुलगी 'शराबी' हिला मोठे करण्याचे स्वप्न ती पाहते. इतर वेश्यांप्रमाणे तिला ती माल समजत नाही. तिला धंदा करायला लावणार नाही असे ठरवते पण ते ही स्वप्न स्वप्नच रहाते. शराबीचे लग्न लावून तिचा संसार मुलबाळ पहाण्याची , आजी होण्याची तिला हौस आहे. हेडमास्तर शराबीवर बलात्कार करतो. गुलाबी तावातावाने त्याला जाब विचारायला जाते तेंव्हा " तुला हे सर्व कांही नवीन नाही" हे त्याचे उत्तर ऐकून हताश होते. आयुष्यभर वेश्याव्यवसाय करणा-या गुलाबीने आयुष्यात अनेक पुरुष पाहिले आहेत. त्यामुळे ती समाजातील पुरुषांविषयी आपली मते ठामपणे व्यक्त करताना दिसते. गुलाबीचे तिची बालमैत्रिण कवितावर नितांत प्रेम आहे. तसेच ती अपर्णावर देखील आपल्या मुलीप्रमाणे प्रेम करते. गुरुवरही तिची माया दिसते. अज्ञान, गरीबी, उपासमार , समाजव्यवस्थेचा बळी ठरलेली दुर्दैवी गुलाबीची व्यक्तिरेखा प्रभावीपणे चित्रित करण्यात लेखिका यशस्वी ठरल्या आहेत असे दिसते.

**कविता**

कविता ही सुसंस्कारीत, पांढरपेशा समाजातील सधन कुंटूबातील गृहिणी आहे तिला अपर्णा व सानंद ही मोठी दोन मुलं आहेत. कविता आपल्या बालपणीच्या मैत्रीणींचा गुलाबीचा शोध घेण्याचे ठरविते. एका वेश्येचा शोध घेणे व सर्वसामान्य स्त्रीचा शोध घेणे यात खूप अंतर आहे हे तिच्या लक्षात येऊनही ती चिकाटीने, अथक परिश्रमाने तिचा

शोध घेते व सर्वतोपरी मदतही करते. तिला गुलाबीचा शोध घेताना पोलीस स्टेशन, वेश्यावस्ती इ. ठिकाणी जावे लागते. कविता पन्नाशीच्या वयातील, स्थूल शरीरयष्टीची असूनही तिला वेश्यावस्तीतील व पोलीस स्टेशनमधील एका वेश्येची चौकशी करताना लोकांच्या वाईट, नजरांना सामोरे जावे लागते. तरीही कविता आपल्या निश्चयापासून ढळत नाही. यातूनच तिचा दृढनिश्चयी स्वभाव दिसतो.

गुलाबीला भेटल्यानंतर तिची करुण कहाणी ऐकून कविताला वाईट वाटते. शराबीला एड्स झाल्याने हळहळते. शराबी व गुलाबीला मदत करतांना आपल्या कुटुंबाकडे थोडेसे दुर्लक्ष झाले तरी तिला आपल्या कुटुंबाची, संसाराची काळजी आहे आपले कुटुंब आनंदी असावे म्हणून ती सतर्क असते. कविता ही अत्यंत संयमी चिंतनशील वृत्तीची आहे. आपल्या घरातील प्रश्न ती मोठया शिताफीने सोडवते.गुलाबी, शराबीला गुंडदादा जेंव्हा खोली सोडायला सांगतो तेव्हा ती काळजीत पडते. खोली सोडली तर त्या दोघी कुठे जातील अशा विचाराने अस्वस्थ होते. वृध्दाश्रमात सोय झाली नाही तर स्वतःचे स्त्रीधन विकून त्यातून भाड्याने खोली घेण्याचा निर्णय घेते.

तिच्या व्यक्तिमत्वाचा हा पैलू तिच्याबद्दल मनात आदराचे स्थान निर्माण करतो. गुलाबी शराबीच्या मदतीसाठीची तिची धडपड वाखाणण्याजोगी आहे. सर्व सामान्य स्त्री ही वेश्याबरोबर बोलत नाही. त्यांच्याकडील काही खात पित नाही. पण कविता गुलाबीच्या घरात जाते, त्यांच्या घरातील पाणी पिते, त्यांच्याबरोबर जेवते. त्यांची सुख दुःखे वाटून घेते. एवढे करुनही आपण त्यांच्यासाठी काही करु शकत नाही असे तिला वाटत राहते. यातून तिच्या मनाचा मोठेपणा दिसतो.

कविता जेंव्हा गुलाबी शराबीने आत्महत्त्या केलेली पाहाते. तेंव्हा ती नखशिखांत हादरुन जाते. एक माणूस म्हणून जगू इच्छिणा-या एका सामान्य गृहिणीचा हा प्रवास व त्यातून प्रेमळ, विचारी , सेवाभावी वृत्तीच्या कविता या नायिकेचे व्यक्तिमत्व स्पष्ट होताना दिसते.

**शराबी**

शराबी गुलाबीची मुलगी आहे. दयानंदशी लग्न केल्यानंतर झालेली. पण त्याची आहे की नाही हे गुलाबीला माहीत नाही. खरे तर गुलाबीने शराबीचे नाव "शैलाबी" असे ठेवलेले आहे. पण तिला उच्चारण्यास अवघड जात असल्याने तिचे नाव शराबीच पडले. शराबी दिसायला गुलाबीप्रमाणे सुंदर , उंच , शेलाटी , बांधेसूद , गोरी आहे. गुलाबीप्रमाणे तीही समाजव्यवस्थेचा बळी ठरलेली आहे.

गुलाबीने तिला बोर्डिंग हायस्कूलमध्ये घातले. ती एक वेश्येची मुलगी असल्याने सर्वजण तिच्याकडे बघून हसतात, तिला पाहून कुजबुजतात. ती शाळेत होणा-या त्रासाला न घाबरता तोंड देते. आपली आई वेश्या व्यवसाय करते हे माहित असून ती ते दाखवत नाही. शराबीला शिकण्याची फार इच्छा आहे. तिला नोकरी करुन आपल्या आईला सुखी ठेवायचे आहे. पण ती सातवीत असताना शाळेचा हेडमास्तर तिच्यावर बलात्कार करतो. शराबीची स्वप्ने धुळीला मिळतात. शराबी खूप विचारी आहे. 'वेश्याच्या मुलींसाठी शाळा नसते. आपले लग्न झाल आणि आपल्या नव-यान आपल्या आईला सांभाळायला नकार दिला तर आपली आई कुठ जाईल१ जे शिक्षण आपल्या आईच्या उपयोगी पडत नाही ते शिक्षण काय कामाचे?' असा ती विचार करते. शेवटी शाळा सोडून आईजवळ राहते. आईचाच व्यवसाय स्वीकारुन आईच व आपल पोट भरते.

देखणी, हसरी , बोलकी तरुण शराबी आपल्याला एड्स झाल्याचे स्वतःच आईला सांगते. एवढ्या मोठ्या आजाराला ती न घाबरता झुंज देते. पोटासाठी आणि आईला लागणा-या औषधोपचारासाठी गि-हाईक घेते. भावूक, हळव्या मनाची शराबी गुरुवर पण माया करताना दिसते. आपल्या आईच्या मैत्रिणीला कविताला मावशी म्हणून हाक मारते. तिच्यावर प्रेम करते. एकदिवस ती जेंव्हा कविताच्या घरी जाते तेंव्हा सर्वसामान्य मुलीप्रमाणे साध्या पंजाबी ड्रेसमध्ये लिपस्टिक न लावता जाते- तिथे ती अपर्णाशी अतिशय सोज्वळपणे वागते. अपर्णा विद्यापीठात एम.ए. करत आहे हे ऐकून तिला अपर्णाचे कौतूक वाटते व आपणही शिकलो असतो तर असा विचार करते. मरण्याआधी

ती मावशीला आपल्याबरोबर जेवणाचा हट्ट करते. जणू तिला आपण मरणार आहोत हे माहीत असावे. अशी विचारी, प्रेमळ , हळवी शराबी आपल्या आईबरोबर आत्महत्त्या करते.

**गौण पात्रे**

**अपर्णा**

अपर्णा ही कविताची मुलगी आहे. सुशिक्षित, सुस्वरूप व समंजस अपर्णा संवेदनशील देखील आहे. ती एम.ए. करते. आपल्या आईला गुलाबीच्या शोधासाठी मदत करते. गुलाबी व शराबीच्या मदतीसाठी धडपडणा-या कविताला स्वयपाकात व इतर कामात मदत करते. स्त्रीवादी विचार करणारी अपर्णा प्रसंगी आपल्या वडिलांनाही घाबरत नाही. उलट प्रश्न विचारताना दिसते.

शराबी जेंव्हा कविताच्या घरी येते तेंव्हा ती मोठ्या मनाने तिच्या सौंदर्याचे कौतुक करते. तिला चहा करुन देते. तिच्याशी मैत्री करते. शराबीला भेटल्यानंतर धीट स्वभावाची अपर्णा गुलाबीला भेटण्याची इच्छा व्यक्त करते. वेश्यांचे पुनर्वसन व्हायला हवे असा एक विचार आपल्या आईपुढे मांडते. त्यावेळेस 'तू करशील का शराबीच लग्न सानंदशी '? असा प्रश्न कविताला विचारायला भाग पाडते. धीटपणे वेश्यावस्तीत वावरते. तिथे तिला अडवणा-या वडिलांच्या मित्राच्या प्रश्नांना परखडपणे उत्तर देते. तिच्या या धाडसाचे कविताला कौतुक वाटते. घरी सानंद व आपल्या वडिलांना आपली मते ठामपणे सांगताना दिसते.

**सानंद**

सानंद हा कविताचा मुलगा आहे. तो अपर्णाप्रमाणे सुशील समंजस, विचारी आहे. आईप्रमाणे आपल्या घरात खेळीमेळीचे आनंदाचे वातावरण असावे यासाठी तो नेहमी सतर्क असतो. गुलाबीचा शोध घेताना तो आपल्या आईबरोबर हेमंत कोठारीला भेटण्यासाठी जातो. पण तेथे आलेल्या वाईट अनुभवामुळे हा शोध थांबवायला सांगतो. आपल्या आईला इंग्रजी डिरेक्टरीमधून नाव, पत्ता शोधण अवघड जातय हे पाहून तिला

मराठी डिरेक्टरी आणून देतो. घरात जेंव्हा अपर्णाला वेश्यावस्तीत नेल्याने वाद होतो. तेंव्हा तो कोणताही हस्तक्षेप करत नाही. आपल्या बाबांचे म्हणणे बरोबर असून आपली आई चुकीची आहे असे समजतो. अपर्णा जेंव्हा त्याला त्याची चूक देते तेंव्हा मात्र तो मोठ्या मनाने आपल्या आईची माफी मागतो.

**कविताचा पती**

कविताचा पती सुशिक्षित व समजूतदार आहे. आपल्या बायकोवर मुलांवर त्याचे प्रेम आहे. गुलाबीला शोधण्यासाठी तो कविताला मदत करत नाही. पण पूर्णपणे विरोधही करत नाही. गुलाबीचा शोध व तिला मदत करतांना अपर्णा व सानंदला बरोबर नेण्यास मनाई करतो. पुरुषप्रधान संस्कृतीप्रमाणे त्यानेही आपल्या बायकोने आपण सांगितलेले ऐकायला पाहिजे. आपल्या मनाविरुध्द् जाता कामा नये अशी त्याची पुरुषी मानसिकता आहे. वेश्यावस्तीत जाण्याने लोक काय म्हणतील ? तिच्या लग्नात अडथळा येईल हा विचार तो अधिक करतो. त्यांनी आपल्या मुलांना बोलण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. म्हणूनच अपर्णा व सानंद स्वतंत्रपणे विचार करुन आपली वेगळी मने मांडतांना दिसतात.

**मावशी**

गुलाबीला शंभर रुपयाला विकत आणून तिला खाऊपिऊ घालून मोठं करून तिला वेश्या व्यवसाय करायला भाग पाडणारी मावशी ही वेश्या आहे. ती प्रेमळ तशीच कठोरपण आहे. मावशी आपल्या म्हाता-या आईला टाकून न देता तिला सांभाळते. तसेच आपल्या जवळचे प्रेम ती स्वार्थापोटी का होईना पण गुलाबीला देते. म्हणून ती प्रेमळ वाटते.

मावशीला जेंव्हा जुळी मूल होतात. एक मुलगा व एक मुलगी होते तेंव्हा ती मुलाला मारुन टाकते व मुलीला जिवंत ठेवते कारण मुलगी म्हणजे तिच्यासाठी वंशाचा दिवा. म्हातारपणाची काठी आहे. मुलगा तिच्यासाठी कांही कामाचा नाही. म्हणून ती त्याला निर्घुणपणे त्याला मारुन टाकते. मावशी आपल्या मुलीचे नांव शराबी ठेवते कारण दारुची जशी नशा चढते तशी शराबीची नशा चढून गि-हाईकांने पुन्हा पुन्हा तिच्याकडे यावे अशी

तिची समजूत आहे. अफूचे प्रमाण जास्त झाल्यामुळे ही शराबीही वारते तिला याचे खूप दु:ख होते. ती खूप खूप रडते पण दूस-या दिवशी ती गि-हाईक होते व गुलाबीलाही घ्यायला लावते. कारण तिला धंदा महत्वाचा वाटतो. आधी गि-हाईकाची सोय मग आपलं सुख दुख. धंदा भावनेपेक्षा श्रमावर चालतो कष्टावर चालतो. गि-हाईकाचं समाधान करतो. त्याला कांही कमी पडत नाही. असे तिचे आपल्या धंदयाविषयीचे तत्वज्ञान आहे. आपला धंदा प्रामाणिकपणे करणारी मावशी शराबी वारल्याच्या दुस-या दिवशी शराबीच्या आत्म्याला दू:ख दिल्याबद्दल कडक उपवास करते.

गुलाबी दयानंदशी लग्न करणार हे समजल्यावर ती या गोष्टीला विरोध करते. लग्न झाल्यानंतरही तुला इथेच यावे लागेल हे पटवून सांगते पण गुलाबी ऐकत नाही. तेंव्हा दयानंदकडून दहा हजार रुपये घेवून गुलाबीला त्याचा हवाली करते. पण लगेच पाचहजार रुपयाला दुसरी मुलगी आणते. आस-याला आलेल्या गुलाबी ती थंडीत कुडकुडत बाहेर ठेवते. धंदा करणार असलीश तरच घरात ये अशी अट घालते. कठोर मनाची, आपल्या मुलीसाठी कडकडीत उपवास करणारी म्हाता-या आईला सांभाळणारी पोरी विकत आणून धंद्याला लावणारी मावशीची व्यक्तिरेखा माणगावेनी प्रभावीपणे चित्रित केली आहे.

**गुरु**

गुरु हे गुलाबीला सहाय्यभूत ठरणारी तिच्या अडचणीत मदत करणारी, पूर्ण पुरुष नसलेली व्यक्तिरेखा आहे. गुलाबीला स्वखर्चाने कॉट, खोली इ. वस्तू खरेदी करुन देतो. तो दलाल म्हणून काम करतो. तो मनाने अतिशय हळवा आणि प्रेमळ आहे. गुरु गुलाबीला आधार देतो. तसेच बाजार तेल, पाणी , रॉकेल हव नको ते सर्व आणून देतो. गुरु शराबीला हायस्कूलमध्ये घालण्यासाठी गुलाबीबरोबर जातो तेंव्हा शराबी गुरुच्या गळयाला मिठी मारुन त्याचा मुका घेते तसा तो कावरा बावरा होतो. शराबीचा त्याला लळा असतो. गुरु देहाने उंचा पुरा धिप्पाड आहे. त्याच्या चेहे-यावरच्या दाढी मिशांचे खुट वाढलेले असतात. घोटयाच्यावर धोतर नेसतो, त्याच्या या सर्व शरीराला न शोभणारा त्याचा बायकी आवाज यामुळे शराबीला तो आवडत नसे. त्याच्यातल्या बाई आणि

पुरुषाच्या एकत्रीकरणाने त्याला आयुष्यातून उठवले होते. बायका त्याला बाई समजत नव्हत्या. पुरुष त्याला पुरुष मानत नव्हते.

जन्माचे व्यंग घेऊन तो जगत होता. स्वतःच्या नातलगांनी त्याच्याशी असलेली नाती तोडली होती. मानलेली नाती जुळत नव्हती. फक्त शराबीशी त्याचे जमले होते. पण तेही फार दिवसाचे नाही. हे त्याला माहिती होते. वाढत्या वयाबरोबर शराबीला आपली घृणा वाटणार हे तो गुलाबीला म्हणतो " तू भाग्याची गुलाबी. तुला निदान बाईचा देह तरी मिळालाय. माझं काय ? मी आपला असाच धरणीला भार... कोणी नाही माझं जगात... एक दिवस असाच मरुन जाणार मी किडा मुंग्यांसारखा ". जगाला एकटा दिसणारा गुरु मनाने हळवा आणि दुःखी होता. शराबीवर जेंव्हा बलात्कार होतो तेव्हा तोही खचतो. ही गोष्ट त्याच्या जिव्हारी लागते. गुलाबीला गि-हाईक पुरवणारा तो शराबीसाठी गि-हाईक आणताना कचरत असे. स्वतःलाच गुन्हेगार समजत असे. नंतर नंतर तो गुलाबीकडे येईनासा होतो. पुढे पुढे गुरु सारख्या दलालांची संख्याही वाढली. संपूर्ण वेश्या वस्ती मवाली, दादा, दलाल, पोलीस यांच्या एका पध्दतशीर यंत्रणेखाली कळसुत्री बाहूलीसारखी खेळवली जाऊ लागली, या सगळ्या चक्रात गुरु कधी बाहेर फेकला गेला कुणाला समजलंसुध्दा नाही. अज्ञातवासात गेल्यासारखा तो परागंदाच झाला. कुणी म्हणे यल्लमाच्या डोंगरावर जाऊन राहिलाय. भीक मागत फिरतोय, त्याचं डोक फिरलयं, तो कधीच मेलाय. असे विविध तर्क लोक करतात खरच त्याच काय झालं हे कुणालाही समजत नाही. गुरुची व्यक्तिरेखा रेखाटण्यात लेखिकेला यश आलेले दिसते.

**दयानंद**

उंचापुरा, गोरापान, धारदार नाकाचा खानदानी घराण्यातील दयानंद गुलाबीला पाहताचक्षणी आवडला होता. दयानंदचे घराणे चांगले घरंदाज इनामदाराचे होते. वडीलांनी दयानंदची बालपणी सर्व हौसमौज केली. दयानंद लाडात वाढलेला. बालपणी अगदी सरळ स्वभावाचा होता. नंतर नंतर त्याला वाईट संगत लागली. मित्रांच्या संगतीने तो वेश्याकडे जावू लागला. अशातच त्याला गुलाबी भेटली. गुलाबीची तब्येत बरी नाही

हे पाहून तो तिच्याशी शारीरिक संबंध ठेवत नाही. मावशी ओरडेल म्हणून तो तिला दोनशे रुपये देतो. तिची आपुलकीने चौकशी करतो. यातून त्याचा दिसून येतो. तो मावशीला दहा हजार रुपये देऊन गुलाबीची तिथून सुटका करतो व तिला आपल्या बंगल्यात नेतो. लग्न केल्यानंतर तो पूर्णपणे बदलतो. दारु पिणे बंद करतो. जबाबदारीची जाणीव होऊन कंपनीत काम करायला लागतो. पण त्याचे आई वडील भाऊ मिळून गुलाबीला हाकलून देतात. तो परत आल्यावरती तुला ती सोडून गेली असे सांगतात. हे ऐकूण त्याला धक्का बसतो. तो 'गुलाबी गुलाबी .. मला सोडून जाऊ नकोस' म्हणून ओरडू लागतो. घरातले त्याला एका खोलीत बंद करुन ठेवतात. त्यामुळे त्याचा मानसिक आजार बळावतो व तो वेडा होतो.

**वातावरणनिर्मिती**

नीलम माणगावे यांनी आपल्या कादंबरीला पोषक वातावरण निर्माण केलेले दिसते. " कादंबरीतील कथानक व व्यक्तिर्शनाला उठाव देण्यासाठी हे वातावरण किंवा पार्श्वभूमी उपयुक्त ठरत असते. " असे डॉ. मदन कुलकर्णी म्हणतात. 'शोध' कादंबरीत दोन स्तरावरचे जीवनचित्रण झालेले आहे. मध्यमवर्गीय पांढरपेशा समाज व वेश्यांचा मागास समाज या दोन्ही स्तरांचे जीवन चित्रण करताना आवश्यक असे वातावरण तयार करण्यामध्ये लेखिका यशस्वी ठरल्या आहेत. कविता, तिचा नवरा, सानंद व अपर्णा ही दोन मुल असे छोटे सुखी कुटुंब आहे. या कूटुंबातील सधनता, व्यक्तिस्वातंत्र्य, पुरुषप्रधानता, घरातील खेळीमेळीचे आनंदी वातावरण उत्तमरित्या चित्रित झालेले दिसते.

'शोध' मध्ये वेश्यांची वस्तीतील रोगराई, उपासमार, गुंडगिरी, दलाल, हिजडे इ. मुळे वेश्यांचे जीवनचित्रण करण्यासाठी आवश्यक ते वातावरण निर्माण करण्यात माणगावे यांना यश आलेले आहे. "गल्लीत इतस्ततः पसरलेली सिगारेटची पाकीटं.. घरासमोरचे पाण्याचे ओहोळ, घोगावणा-या माशा, हूंगणारी कुत्री, डुकरं, मांजरे एकूणच एखाद्या गलिच्छ झोपडपट्टीचे दृश्य एखादे टपरी वजा हॉटेल हॉटेलातून येणारा सिनेमातल्या उडत्या गाण्यांचा कर्कश्श आवाज". या वर्णनातून माणगावे वेश्या जीवनाचे पूरक

वातावरण तयार करतात. गुलाबीच्या भोवतालचे वातावरण तयार करण्यासाठी अशा प्रकारचा भरपूर तपशील त्या देतात. त्यामुळेच त्यांच्या कांदबरीतील वेश्याजीवन चित्रणाला वास्तवता प्राप्त झालेली दिसून येते. मावशी,कल्लादादा , रोगराई , वेश्यांचे नटणे,वेश्यांचे श्रध्दास्थान, यल्लमा इ.अनेक प्रकारच्या चित्रणातून लेखिकेला योग्य ते वातावरण निर्माण करता आले आहे.

**भाषाशैली**

विचार, भावना,कल्पना, अनुभव व्यक्त करण्यासाठी मनुष्य भाषेचा वापर करतो. माणगावेंची भाषाशैली ही सोपी आहे. सहजता प्राप्त झालेली दिसते. बोजड क्लिष्ट शब्दांनी रंगवलेली दिसत नाही. शिवाय फार अलंकार परिधान करुन कारणापेक्षा जास्त नटलेली दिसत नाही.

उदा. "अगदी तुझ्यासारखीच आहे शराबी !

हं तिनं मोठा निश्वास सोडला.

जमिनीला हाताचा रेटा देऊन ती मग हळूहळू उठून बसली.

गुलाबीचं जणू चैतन्य हरवलेल्या झाडांचं जुनाट खोड झालं होतं.

ना देखणेपणा. .. ना लव लव पालवी... "

लेखिका एखाद्या व्यक्तिचे वर्णन हुबेहुब करतात त्यामुळे ती व्यक्ती डोळ्यासमोर उभी राहते. "समोर पांढ-या ... पांढ-या केसाची एक म्हातारी बसली होती. अंगावर विटकी साडी ... वर तेवढाच विटका ... मळका स्वेटर । अधू झालेले पिचपिचे डोळे.. भुरकटलेला चेहेरा चेहे-यावर देवीचे वण । मोठी विचित्र दिसत होती ती म्हातारी ।"

गुलाबी, शराबीचे दु:ख त्यांच्यावर झालेले अन्याय , कवितेची त्यांच्या मदतीसाठी धडपड इ. चे चित्रण करताना त्यांची भाषा मनाचा ठाव घेताना दिसते. छोटी छोटी, सुटसुटीत वाक्यांचा वापर दिसतो. हिंदी व इग्रजी शब्दांचा देखील योग्य त्या ठिकाणी वापर केलेला दिसतो.

उदा. "तू गुलाबी को जानती है? "

जानती थी । " अब कंहा है वो? "

मार्जीन, बिल्डर, कमीशन, थँक्यू, ड्रेस,डिरेक्टरी इ. असे इंग्रजी शब्द वापरले आहेत. काही ठिकाणी नाटयभाषेचा वापर करुन प्रसंग उठावदार केलेला आहे. अडाणी गुलाबीची तोंडची भाषा, शब्द व सुशिक्षित, सभ्य, सुसंस्कृत घरातील कविताची भाषा ही एकसारखी वाटते. त्या भाषेमध्ये फरक असायला हवा होता असे कादंबरी वाचतांना सतत जाणवते. या मर्यादा सोडल्या तर त्यांची भाषा योग्य तो परिणाम साधतांना दिसते. साधेपणात त्यांच्या भाषेचे सौंदर्य दडलेले दिसते. बोजड क्लिष्ट भाषेचा वापर त्या करीत नाहीत. सर्वसामान्याना समजेल अशा सोप्या भाषेत लिहितांना दिसतात.माणगावे यांनी या कादंबरीत योग्य प्रतिमांचा वापर केलेला दिसतो.

उदा. 'पाऊस पडून गेल्यावर ऊन पडाव तसं तिच हसंण वाटलं'

'ढगाआड चंद्र लपावा तशी ती दिसेनाशी झाली.'

'गुलाबीच जणु चैतन्य हरवलेल्या झाडांच जुनाट खोड झालं होत.'

'दयानंद हिमालयाएवढा मोठा व समुद्रासारखा अथांग वाटला.'

अशाप्रकारच्या प्रतिमांचा योग्य त्या ठिकाणी वापर करुन लेखिकेने प्रसंग व घटना परिणामकारकरितीने चित्रित केल्याचे दिसून येते. त्यामुळे कादंबरीला उठावदारपणा आलेला आहे.

**घटना व प्रसंगाची मांडणी**

हरवलेल्या मैत्रिणींचा शोध या प्रसंगावर आधारीत 'शोध ' ही कादंबरी आहे. कादबरीतील घटना क्रमाक्रमाने घडत जातात. बालमैत्रिणीची आठवण त्या काळातील वेश्यावस्ती, बालमैत्रिण वेश्या गुलाबी तिचा शोध घेतांना कविताला आलेले बरे वाईट अनुभव यातून घडणा-या घटना येणारे प्रसंग याची मांडणी सहजपणे मांडलेली आहे.

शोध कादंबरीतील कविता गुलाबीच्या आयुष्यात घडून गेलेल्या घटनांचा शोध लावते. दयानंद गायकवाडने दयानंदशी लग्न केले ही घटना प्रथमदर्शनी आनंददायी वाटते. गुलाबीच्या दु:खाच्या फे-यांतून सुटका झाली असे वाटते पण नंतरही तिच्यावर दु:खाचे

डोंगर कोसळतात. गुलाबीचे भिक मागणे , पोलीसांनी तिच्यावर बलात्कार करणे, सासू सास-यांने तिला घरातून हाकलून लावणे, मावशीनेही तिला घरात असरा न देणे इ. प्रत्येक उठावदारपणे चित्रित करण्यात लेखिकेला यश आलेले दिसते.

लेखिका बलात्काराचा प्रसंग अतिशय संयमाने रेखाटतात.

पोलीस तिच्या अंगाशी भिडलेला जाणवला. तिने ओरडण्याचा प्रयत्न केला ती हाताचा दगडी पंजा तिच्या तोंडावर मारुन तो डाफरला. "ओरडू नकोस" भितीने आणि तोंडावर पडलेल्या ठोशाने तिची जणू दातखीळीच बसली. तोंडातून आवाज येईनासा झ ाला. आणि... त्याने तिच्या अंगावरच्या खादीच्या साक्षीने बलात्कार केला. एकदा... दोनदा... तीनदा... म्हणजे तिच्या लक्षातही आले नाही. किती लोकांनी आपला लचका तोडला. " हा प्रसंग वाचल्यानंतर वाचकाला त्या पोलीसाचा राग आल्यावाचून व गुलाबीबद्दल सहानुभूती वाटल्यावाचून राहवत नाही. प्रभावी संवादाच्या माध्यमातून प्रसंग घटनांच्या गुंफणीतून कथानक आकार घेत पुढे सरकताना दिसते. कांही घटना व प्रसंग चित्तथरारक, उत्कंठा वाढविणारे आहेत. उदा. "पैसा महत्त्वाचा" देवबिव मग मसणात का जाईनात, मला काय त्याचं? ये शराबी ... शराबीला उद्देशून तंबी दिल्यासारखा तो म्हणाला " चार दिवसात जागा खाली झाली पाहिजे सांगून ठेवतो! न्हाई तर हात धरुन हाकलून देईन!". असे मनाला भिडणारे प्रसंग रंगविण्यात माणगावे यशस्वी झालेल्या दिसतात.

तसेच "गर्दीतून वाट काढत काढत मी आत गेले आणि माझी बोबडीच वळली. गुलाबी आणि शराबी दोघींनीही या जगाचा निरोप घेतला होता. दोघींच्या तोंडातून फेस बाहेर आला होता. पाय घासून घासून दोघींच्याही पायाखालची जमीन सोलून निघाली होती.

दोघीनीही आत्महत्त्या केली होती...

दोघी माझ्यासमोर होत्या. पण माझ्याशी बोलत नव्हत्या. बघतसुध्दा नव्हत्या.

दोघींचे डोळे घट्ट मिळलेले...

की कुणी मिटवले होते?"

असे हृदयद्रावक मनाला चटका हुरहुर लावणारे प्रसंगचित्रण करण्यात लेखिकेला यश आलेले दिसते. पण कांही घटना मुद्दाम घडवून आणल्या सारख्या वाटतात. कविता गुलाबीला गजरा देते. तो गजरा गुलाबी पायाखाली तुडवते. लेखिकेने वेश्या विषयाला हात घालण्यासाठी ही घटना घडवून आणल्यासारखी वाटते.

**निवेदनशैली-**

निवेदनातून घटना प्रसंगामध्ये सुसंगती आणली जात असते. संज्ञा- संकल्पना कोशामध्ये 'निवेदन म्हणजे घटनांची मालिका ' असे म्हटले आहे. माणगावेंनी ' शोध' कादंबरीतील ओघवते निवेदन करुन कादंबरी वाचनीय केलेली आहे असे दिसते. मानवी स्वभावाची गुंतागुत उलगडून दाखविण्यासाठी त्यांनी निवेदनाचा आधार घेतला आहे असे दिसून येते. काही ठिकाणी मानवी स्वभाव तसेच वास्तू याविषयी वर्णनात्मक तपशील आढळतो. त्यांच्या निवेदनातून शराबीबद्दल सहानुभूती जाणवते.

"त्यातच कंपनीच्या कामासाठी म्हणून दयानंद चार दिवसासाठी गुजरातला निघाला. तेंव्हा ती धास्तावलीच परकेपणाच्या या घरात त्याचाच एक आधार होता.आणि त्याच्या अनुपस्थितीत दिवस आपण इथं एकट राहायचं, ही कल्पनाच तिला भयंकर वाटली." अशा प्रकारच्या निवेदनातून गुलाबीचा भित्रा स्वभाव स्पष्ट होतो. लेखिकेने निवेदनातील गती व लय सांभाळून निवेदनात प्रवाहीपण आणले आहे.

**समारोप**

' शोध ' या सामाजिक कादंबरीचा सामाजिक वाङ्मयीनदृष्टया अभ्यास करतांना वेश्याजीवनावर आधारित आहे हे लक्षात येते. वेश्येचे जीवनचित्रण करत असतांना नीलम माणगावे एकूणच स्त्री जीवनावर भाष्य करतांना दिसतात. त्यांनी वेश्या वस्तीत राहणा-या मागास समाजाबरोबरच मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजाचे जीवन चित्रणही केलेले दिसते.

वि.वा. हडप यांच्या 'वाकडे पाऊल', बहकलेली तरुणी' 'निवळलेली तरुणी,' यासारख्या कादंब-यात वेश्या व्यवसायाचा निर्देश आढळतो. राजन गवस यांच्या 'चौडंक'

या कादंबरीत  देवदासीचे जीवन चित्रण आढळते. देवदासी व वेश्यांचे दु:ख सारखेच असल्याचे दिसते. माणगावे यांच्या'शोध'कादंबरीतील गुलाबीच्या वेश्येला आपल्या मुलीने वेश्या व्यवसायात न पडता  शिकून व नोकरी करुन संसार करावा वाटते. पण तिचे हे स्वप्न पुर्ण होत नाही. गुलाबी व शराबी दोघीही समाजव्यवस्थेचा बळी पडताना दिसतात.

"आपल्यासारखेच हात,पाय ,नाक,डोळे,मन,भावना,विचार असलेल्या, पण चेहरा हरवलेल्या ... वरुन नटलेल्या आतून फाटलेल्या सख्यानां..." अशाप्रकारच्या भावनेतून लिहिलेल्या अर्पण पत्रिकेत माणगावे यांनी आपली  'शोध' लिहिण्यामागची प्रेरणा विषद केलेली दिसते. वेश्येचे दु:ख , व्यथा चित्रित करण्यात माणगावे यांना यश आल्याचे दिसून येते 'शोध' कादबरी वाचल्यानंतर वेश्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलल्याखेरीज राहत नाही. त्यांच्याबद्दल वाचकांना आस्था वाटायला लागते. त्यांचे जीवन सुखी होण्यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत असे विचार वाचकांच्या मनात आल्याखेरीज रहात नाही.

घटना, प्रसंगाच्या मांडणीतून प्रवाही निवेदनातून कथानकाला रंजकता आलेली दिसते. काही घटना जाणूनबुजून घडवल्या जात आहेत असे दिसते तर कांही वेळेला कांही पात्रे लेखिकेच्या मतानुसार वागताना दिसतात. अशा काही  मर्यादा सोडल्या तर 'शोध' कादंबरीतील वेश्याजीवन चित्रित क रण्यात यश आलेले दिसते. त्यांनी वेश्या व एकूणच स्त्रीबद्दल चिंतन केलेले दिसते. पण ते सखोल झालेले दिसत नाही. त्यांची भाषा साधी , सरळ आहे.  त्यांच्या भाषेत क्लिष्टता, संस्कृतप्रचूरता,  अलंकारीकता दिसून येत नाही.

चौथ्या  प्रकरणात आपण नीलम माणगावे यांच्या 'मृत्युदंड ' या कांदबरीतील समाज जीवन व वाङ्:मयीन वैशिष्ट्ये यांचा अभ्यास करणार आहोत.

# संदर्भ-सूची


१. पाटील, विजय : 'वेश्याव्यवसायाची नवी दुनिया,' प्रतापसिंह जाधव (संपा.), दै. पुढारी, ०३ एप्रिल २००८.

२. जाधव, रा. ग. : 'साहित्य व सामाजिक संदर्भ,' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजया नगर, पुणे, तृ. आ. २००३, पृ. क्र. ७४.

३. माणगावे, नीलम : 'शोध,' सुकृत प्रकाशन, सांगली, प्र. आ. २००५, पृ. क्र. १७४.

४. जाधव, रा. ग. : 'साहित्य व सामाजिक संदर्भ,' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजया नगर, पुणे, तृ. आ. २००३, पृ. क्र. १८६.

५. माणगावे, नीलम : 'शोध,' सुकृत प्रकाशन, सांगली, प्र. आ. २००५, पृ. क्र. १५९.

६. तत्रैव, पृ. क्र. ५६.

७. तत्रैव, पृ. क्र. ६०.

८. तत्रैव, पृ. क्र. ६०.

९. तत्रैव, पृ. क्र. ५७

१०. तत्रैव, पृ. क्र. २५.

११. तत्रैव, पृ. क्र. ८१.

१२. तत्रैव, पृ. क्र. ८१-८२.

१३. तत्रैव, पृ. क्र. १५३.

१४. तत्रैव, पृ. क्र. ६४-६५.

१५. तत्रैव, पृ. क्र. ६५.

१६. तत्रैव, पृ. क्र. १०२.

१७. तत्रैव, पृ. क्र. १३८.

१८. तत्रैव, पृ. क्र. ८९-९०.

१९. तत्रैव, पृ. क्र. १६८.

२०. कुलकर्णी, श्री. मा., पृ. क्र. ९३.

२१. माणगावे, नीलम : 'शोध' सुकृत प्रकाशन, सांगली, पृ. क्र. १४०.

२२. कुलकर्णी, म. द. : 'मराठी प्रादेशिक तंत्र आणि स्वरूप,' मंगेश प्रकाशन, नागपूर, प्र. आ., पृ. क्र. ८.

२३. माणगावे, नीलम : 'शोध' सुकृत प्रकाशन, सांगली, पृ. क्र. ९७.

२४. तत्रैव, पृ. क्र. ९७.

२५. तत्रैव, पृ. क्र. २३.

२६. तत्रैव, पृ. क्र. ६४.

२७. तत्रैव, पृ. क्र. १२६.

२८. तत्रैव, पृ. क्र. १८३.

२९. तत्रैव, पृ. क्र. १९१.

३०. तत्रैव, पृ. क्र. ११७.